
असाध्य ते साध्य करिता सायास ।
कारण अभ्यास तुका म्हणे ॥

# असे घटते सुंदर अक्षर

अशोक शंकरराव ताकभोगे



## हस्ताक्षरलक्षण

-समर्थ रामदास

ब्राह्मणे बाळबोध अक्षर । घडसून करावे सुंदर ।
जे देखतांचि चतुर । समाधान पावती ॥
वाटोळे सरळे मोकळे । वोतले मसीचे काळे ।
कुळकुळीत वोळी चालिल्या ढाळे । मुक्त माळा जैशा ॥
अक्षरमात्र तितुके नीट । नेमस्त पैस काने नीट ।
आडव्या मात्रा त्याही नीट । आर्कुली वेलांट्या ॥
पहिले अक्षर जे काढिले । ग्रंथ संपेतो पाहात गेले ।
येका टांकेचि लिहिले । ऐसे वाटे ॥
अक्षराचे काळेपण । टांकाचे ठोंसरपण ।
तैसेचि वळण वांकण । सारिखेची ॥
वोळीस वोळी लागेना । आर्कुली मात्रा भेदीना ।
खालिले वोळीस स्पर्शेना । अथवा लंबाक्षर ॥
पान शिष्याने रेखाटावे । त्यावरी नेमकेचि ल्याहावे ।
दुरी जवळी न व्हावे । अंतर वोळीचे ॥
कोठे शोधासी आडेना । चुकी पाहतां सांपडेना ।
गरज केली हे घडेना । लेखकापासुनी ॥
ज्याचे वय आहे नूतन । त्याने ल्याहावे जपोन ।
जनासी पडे मोहन । ऐसे करावे ॥

**२० वर्षांत ३००००**
**विद्यार्थी व प्रौढ सदस्यांनी**
**अक्षर सुधारण्यासाठी**
**वापरलेली हस्तपुस्तिका!**
**किंमत : रु. २०/-**
**ज्ञान प्रबोधिनीची अन्य संग्राह्य प्रकाशने**
**खालील पत्त्यावर उपलब्ध!**

**छात्र प्रबोधन**
**ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी कृतिशीलता जोपासणारे मासिक!**
- पाचवीच्या वरील प्रत्येक मुलामुलींसाठी मासिक !
- ज्ञान-मनोरंजन-विचार-कृती-प्रेरणा यांचा अनोखा समन्वय जपणारे मासिक !
- १६ वर्षे उत्कृष्ट दिवाळी अंकाचे पुरस्कारप्राप्त मासिक !

**मासिकाचे सभासद व्हा ! वार्षिक वर्गणी रु. १८०/-**

**वितरक** - छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ३०. ☎ ०२०-२४२०७१७४

**✻ प्रकाशक व मुद्रक ✻**
संपादक, छात्र प्रबोधन,
ज्ञान प्रबोधिनी,
५१० सदाशिव पेठ, पुणे ३०.

**✻ लेखक ✻**
श्री. अशोक शंकरराव ताकमोगे

**✻ मुखपृष्ठ-चित्र ✻**
श्री. एस. के. परब, मुंबई

**प्रथम आवृत्ती**
शके १९१६, जुलै १९९४

**द्वितीय आवृत्ती**
शके १९१७, जुलै १९९५

**तृतीय आवृत्ती**
शके १९२१, डिसेंबर १९९९


**चतुर्थ आवृत्ती**
शके १९२५, जुलै २००३
ते
शके १९३४, ऑक्टोबर २०१२

**पुनर्मुद्रण**
शके १९३६, ऑगस्ट २०१४

**किंमत रु. २०/-**
(५० किंवा त्यापेक्षा अधिक प्रतींची मागणी केल्यास पुस्तक **रु. १५/-** या सवलतीच्या दरात मिळेल.)

## अशोक शंकरराव ताकमोगे

**एम. ए. (मराठी) बी.एड.**



**१९७४ :** वयाच्या चोविसाव्या वर्षी एम.ए.ला असताना स्वत:चे हस्ताक्षर प्रयत्नपूर्वक सुधारले.

**१९७७-७८ :** लोकबिरादरी आश्रमशाळा, हेमलकसा, जि. गडचिरोली येथील तीन इयत्तांमधील आदिवासी मुलांचे हस्ताक्षर घटवून घेतले.

**१९८१-८६ :** ज्ञान प्रबोधिनी कृषितांत्रिक विद्यालय खेड-शिवापूर, जि. पुणे येथे आठवी ते दहावी या तीन इयत्तांमध्ये इतर सहकारी अध्यापकांच्या मदतीने मराठी व इंग्रजी हस्ताक्षर सुंदर रूपात घटवून घेतले. तसेच देवनागरी लिपीतील अक्षरे मिलीमीटरमध्ये प्रमाणबद्ध करून इंजिनिअरिंग ड्रॉइंग (शीट) काढून घेतले.

**१९८८-९० :** सौ. सुरेखा हुल्ले (विज्ञान व गणित अध्यापिका), सौ. वैजयंती बदोले (मराठी व चित्रकला अध्यापिका) व सौ. मनीषा चोपडे (गृहिणी) यांच्या हस्ताक्षरात या पद्धतीमुळे लक्षणीय सुधारणा झाल्या. कोणत्याही वयात सुंदर हस्ताक्षर घटवता येते, हे अनेक प्रयोगांवरून निश्चित झाले आहे.

✻✻✻

**कोणत्याही वयात हस्ताक्षर बदलता येते. म्हणून एका दमात अक्षर न काढता, त्याचे अवयव योग्य आकारात व ठराविक क्रमाने काढल्यास अक्षर सुंदर होते. या तत्त्वावर आधारित अशी ही कृतिपुस्तिका !**

# असे घटते सुंदर अक्षर

हस्ताक्षर बदलता येते का ? अक्षर सुधारते का ? असे प्रश्न अनेकांना पडतात. पहिलीत एकदा हस्ताक्षर घटले की ते पुन्हा बदलत नाही, असा अनेकांचा गैरसमज असतो.

आदिवासी मुले, ग्रामीण मुले, शहरी मुले, प्रौढ स्त्री–पुरुष आणि गृहिणी यांच्या हस्ताक्षरात बदल करण्याचा मी प्रयत्न केला. निश्चित पद्धती ठरविली. तेव्हा कोणत्याही वयात हस्ताक्षर बदलता येते, हे निश्चित झाले.

## हस्ताक्षर सुधारण्यासाठी

* **मनाचा ठाम निश्चय हवा.**
* **दररोज नियमित वेळ द्यायला हवा.**
* **ठरावीक पद्धतीने लेखनसराव करायला हवा.**

अक्षर म्हटले की पूर्ण अक्षर आपल्या डोळ्यांसमोर येते. ते अक्षर आपण काढतो, तेव्हा त्याचे अवयव लक्षात घेत नाही. त्यामुळे अक्षराचा आकार आणि वळण व्यवस्थित येत नाही; म्हणून एका दमात अक्षर न काढता, त्याचे **अवयव योग्य आकारात व ठरावीक क्रमाने काढल्यास अक्षर सुंदर होते**. हे या पद्धतीचे मूलतत्त्व आहे.

सुलेखनासाठी काही सूचना दिल्या आहेत, त्या अनेक वेळा लक्षपूर्वक वाचा व त्याप्रमाणे काटेकोर सराव करा. सरावासाठी ३२ पृष्ठे दिली आहेत. एका दमात सर्व काढून रिकामे होऊ नका. क्रमाक्रमाने रोज थोडा थोडा वेळ चित्त ओतून सराव केल्यास आणि सराव करताना ‘माझे अक्षर मला सुंदर करायचे आहे’ असे मनाशी म्हणत सराव केल्यास निश्चित अक्षर सुधारेल.

**अशोक शंकरराव ताकमोगे**
‘अनमोल’, निर्मलनगर,
एस्. टी स्टँडजवळ,
सोलापूर ४१३००२.